9 DEC 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्यापूर्वी आंबेडकरांनी देशाच्या विकासाचा रोडमॅप आखला

## अर्थशास्त्रज्ञ डॉ. पी. एस. कांबळे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन


प्रतिनिधी

कोल्हापूर

स्वतंत्र भारताच्या विकासाचे धोरण कसे असावे त्याची व्याप्ती व रचना यांची मांडणी डॉ. आंबेडकर यांनी भारत स्वतंत्र होण्यापूर्वीच करून ठेवली. भारताच्या सर्वंकष विकासाचा रोडमॅप आखून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे द्रष्टे धोरणकर्ते होते, असे प्रतिपादन अर्थशास्त्रज्ञ डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने ६१ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विकास नीतीबाबत विचार व सद्यस्थिती" या विषयावर ते बोलत होते.

डॉ. कांबळे म्हणाले, डॉ. आंबेडकरांनी देशाच्या प्रगतीसाठी सरकारला काही गोष्टी सांगितल्या होत्या. यामध्ये भारताच्या विकासाचे शेती व उद्योग हे महत्वाचे भागीदार असून त्यांची मालकी सरकारकडे असावी. शेतजमिनीच्या तुकडीकरणाने कृषी उत्पादन कमी होत असून त्यातून आर्थिक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे गरजेचे आहे. विमा ही सरकारची मक्तेदारी असणे व देशातील प्रत्येक नागरिकाचा आयुर्विमा उतरविणे आवश्यक आहे. भारतामध्ये प्राथमिक शिक्षण महत्वाचे आहेच, परंतु उच्च शिक्षणही गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाचा सर्व खर्च केंद्र व राज्य सरकारने केला पाहिजे. तसेच शिक्षणासाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून, समाजातील वंचित घटकांना विदेशी शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने विशेष तरतूद केली पाहिजे, असेही डॉ. आंबेडकरांनी सरकारला सांगितले होते. राजकीय, आर्थिक, सामाजिक समतोल साधण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या आधुनिक धोरणामुळे शहरी व ग्रामीण यांच्यातील समतोल बिघडत चालला असून आर्थिक व सामाजिक विषमतेबरोबरच उपभोग खर्चावरील विषमताही वाढत आहे. शिक्षण हा समाजाचा अविभाज्य घटक असताना शिक्षणाच्या खाजगीकरणातून सामाजिक वंचितता वाढत आहे. देशातील विषमतेची दरी मिटवण्यासाठी डॉ. आंबेडकरांची विकास नीती सरकारच्या धोरणात समाविष्ट केली पाहिजे, अशी अपेक्षाही डॉ. कांबळे यांनी व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. पी. एस. कांबळे. सोबत केंद्र संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन.

अध्यक्षीय भाषणात केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, संपूर्ण भारताच्या विकासाच्या नियोजनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा समावेश झाला पाहिजे. डॉ. आंबेडकर भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळात श्रम, ऊर्जा व जलमंत्री असताना त्यांनी विकासासाठी जी धोरणे मांडलेली आहेत, ती आजही तितकीच उपयुक्त असून त्यांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

तेजश्री सावंत यांनी प्रास्ताविक केले. मेघा कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. एस.एस. कांबळे, प्रा. जी.बी. अंबपकर, अविनाश भाले यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स



कोल्हापूरच्या विकासाची खूण शिवाजी विद्यापीठ

विवेककुमार सिंह